# महाविद्यालयांनी गुणांची डेटा एन्ट्री त्वरित करावी



- शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांचे आवाहन
- डेटा एन्ट्री करण्यास ८ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १५ ते ३१ डिसेंबर दरम्यान घेतलेल्या परीक्षांच्या गुणांची डेटा इंट्री महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या लॉगईनवर अद्याप केलेली नाही. मुदतवाढ देऊनही विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून असणाऱ्या गुणपत्रिकांचे काम महाविद्यालयाकडून होत नसल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी त्वरित डेटा इंट्री करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयात ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. विज्ञान विभागातील संशोधनाचे काम प्रयोगशाळेत आल्याशिवाय होत नाही. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या पार्श्वभूमीवर कॉलेज सुरू करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. परंतू कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून पुढील सूचना आल्या नसल्याने जिल्हा प्रशासनानेही महाविद्यालये सुरू करण्याच्या सूचना दिल्या नाहीत. तसेच विद्यापीठाची वसतिगृहसुध्दा अद्याप जिल्हा प्रशासनाच्याच ताब्यात आहेत. अचानक महाविद्यालयातील वर्ग सुरू झाले तर १५ ते ३१ डिसेंबर दरम्यान झालेल्या परीक्षांचे निकाल जाहीर न झाल्याने विद्यार्थ्यांना वर्गात बसता येणार नाही. त्यामुळे डेटा इंट्री करण्यास ८ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयांनी गुणांची डेटा इंट्री केल्यास विद्यार्थ्यांना गुणपत्रक देऊन त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर होईल.



कोल्हापूर : 'सरोजिनी बाबर : कार्य, संशोधन आणि लेखन' या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राजन गवस व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

# 'बाबर यांच्याकडून लोकज्ञानाचे संकलन'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकसाहित्य हे लोकज्ञान मानून या ज्ञानाचे संकलन करण्याच्या कामी डॉ. सरोजिनी बाबर यांनी हयात वेचली. त्यांच्या कार्याविषयी शिवाजी विद्यापीठामार्फत पुस्तक प्रकाशित होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे कार्यरत असणाऱ्या डॉ. वैशाली भोसले यांनी संपादित केलेल्या 'सरोजिनी बाबर : कार्य, संशोधन आणि लेखन' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गवस बोलत होते. विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. गवस यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सरोजिनी बाबर यांच्या भगिनी कुमुदिनी पवार या उपस्थित राहू न शकल्याने त्यांच्या शुभसंदेशाची ध्वनिचित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. वैशाली भोसले यांनी संपादकीय मनोगत व्यक्त केले. सहसंपादक मृणालिनी जगताप यांनी आभार मानले. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नितीन माळी, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, किरण गुरव आदी उपस्थित होते.